-: महाराष्ट्र शासन :-

गृह विभाग

न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

विद्यानगरी, कालीना, हंसभुग्रा मार्ग, सांताक्रुज (पूर्व), मुंबई - ४०० ०९८.

दूरध्वनी- ०२२- २६६७ ०७५५/४१६५/०९६५ फॅक्स - ०२२- २६६७ ०८४४

ई-मेल :- dir.fsl@maharashtra.gov.in Web :- dfsl.maharashtra.gov.in


---

## जाहिरात क्रमांक १, सन-२०१८

गट -क व गट-ड या संवर्गातील पदांच्या सरळसेवा भरतीसाठी जाहिरात.

शासन निर्णय, गृह विभाग क्र.एफएसएल-०४१६/प्र.क्र.४७/पोल-४, दि.३१.१.२०१७ आणि शासन पत्र, गृह विभाग क्र.एफएसएल-०४१७/प्र.क्र.१४०/पोल-४, दि.२१.३.२०१७ तसेच शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. मातंसं-०८८/२७/२०१६-DIR IT (MH), दि.१९.९.२०१७ व शासन पत्र, गृह विभाग क्र.एफएसएल-०४१७/प्र.क्र.५८७/पोल-४, दि.३१.१०.२०१७ मधील दिलेल्या निर्देशानुसार न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या अधिपत्याखालील मुंबई, नागपूर, पुणे, औरंगाबाद, नाशिक, अमरावती, नांदेड व कोल्हापूर प्रयोगशाळेतील **गट क व गट ड संवर्गातील** सरळसेवेतील खालील रिक्त पदांसाठी **ऑनलाईन पध्दतीने** अर्ज मागविण्यात येत आहेत. ऑनलाईन (Online) पध्दतीने अर्ज सादर करण्याबाबत सविस्तर सूचना महापरीक्षेच्या www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. अर्ज भरण्यापूर्वी उमेदवाराने संपूर्ण जाहिरात काळजीपूर्वक वाचावी. या पदांसाठी खालील अटी व अर्हतेची पूर्तता करणारे उमेदवार अर्ज करू शकतात.

वर नमूद केलेल्या पदांचा अनुशेष, सामाजिक व समांतर आरक्षण तसेच रिक्त पदांची संख्या विचारात घेऊन भरावयाच्या पदांचा तपशील, त्यांची वेतनश्रेणी, शैक्षणिक अर्हता तसेच अनुभव याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

## २. उपलब्ध पदसंख्या :-

| अ. क्र. | पदनाम ,गट व वेतनसंरचना | एकूण पद संख्या | आरक्षणानुसार प्रवर्गनिहाय पदे | आवश्यक शैक्षणिक अर्हता | आवश्यक अनुभव |
|---|---|---|---|---|---|
| १ | वैज्ञानिक सहायक (गट क)<br>Scientific Assistant<br>रु.९३००-३४८०० ग्रेड पे-४२०० | २० | २० | विज्ञान शाखेतील रसायनशास्त्र विषयासह मान्यताप्राप्त विद्यापीठाची कमीत कमी दुसऱ्या वर्गात पदवी उत्तीर्ण.<br>**किंवा**<br>न्यायसहायक विज्ञान विषयासह विज्ञान शाखेतील मान्यताप्राप्त विद्यापीठाची कमीत कमी दुसऱ्या वर्गात पदवी उत्तीर्ण. | --- |

| एकूण रिक्त पदसंख्या | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| विहित सामाजिक आरक्षण | ३ | ३ | १ | ० | ० | ० | ० | ३ | १० | २० |

| समांतर आरक्षण | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण | १ | १+२* | १ | ० | ० | ० | ० | १ | ३ | ९ |
| महिला आरक्षण ३०% | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ३ | ५ |
| माजी सैनिक १५% | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | ३ |
| पदवीधर/ पदविकाधारक अंशकालीन १०% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| प्रकल्पग्रस्त ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| खेळाडू ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| भूकंपग्रस्त २% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| **एकूण** | **३** | **३** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **३** | **१०** | **२०** |
| अपंग आरक्षण ३% | १८ पदांपैकी १ पद OL (One Leg Affected) प्रवर्गाकरीता राखीव. | | | | | | | | | |
| * २ अनुशेषातील पदे | | | | | | | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | वैज्ञानिक सहायक (संगणक गुन्हे, ध्वनी व ध्वनीफीत विश्लेषण), (गट क) Scientific Assistant (Cyber Crime, Tape Authentication & Speaker Identification) रु.९३००-३४८०० ग्रेड पे-४२०० | ७३ | ७३ | विज्ञान शाखेतील भौतिकशास्त्र किंवा संगणक शास्त्र किंवा इलेक्ट्रॉनिक्स किंवा माहिती आणि तंत्रज्ञान या विषयासह किमान व्दितीय श्रेणीतील पदवी **अथवा** अभियांत्रिकी शाखेतील संगणक शास्त्र किंवा इलेक्ट्रॉनिक्स किंवा माहिती आणि तंत्रज्ञान या विषयासह किमान व्दितीय श्रेणीतील पदवी उत्तीर्ण. **किंवा** B.Sc. (Forensic Science) **किंवा** Post Graduate Diploma in Digital and Cyber Forensic and Related Law | --- |

| एकूण रिक्त पदसंख्या | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| विहित सामाजिक आरक्षण | १० | ४ | २ | २ | २ | २ | २ | १५ | ३४ | ७३ |

| समांतर आरक्षण | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण | २+१* | १ | १ | १ | १ | १ | १ | ४+१* | ११ | २५ |
| महिला आरक्षण ३०% | ३ | १ | १ | १ | १ | १ | १ | ४ | ८ | २१ |
| माजी सैनिक १५% | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ | ७ | ११ |
| पदवीधर/ पदविकाधारक अंशकालीन १०% | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ | ३ | ७ |
| प्रकल्पग्रस्त ५% | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | २ | ४ |
| खेळाडू ५% | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | २ | ४ |
| भूकंपग्रस्त २% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| **एकूण** | **१०** | **४** | **२** | **२** | **२** | **२** | **२** | **१५** | **३४** | **७३** |
| अपंग आरक्षण ३% | ७१ पदांपैकी २ पदे OL (One Leg Affected) प्रवर्गाकरीता राखीव. | | | | | | | | | |
| * २ अनुशेषातील पदे | | | | | | | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | वरिष्ठ प्रयोगशाळा सहायक (गट क)<br>Senior Laboratory Assistant<br>रु.५२००-२०२०० ग्रेड पे-२४०० | १० | १० | विज्ञान शाखेत उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (HSC Science) परिक्षा उत्तीर्ण. | --- |

| एकूण रिक्त पदसंख्या | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| विहित सामाजिक आरक्षण | १ | ० | ० | ० | १ | ० | ० | ३ | ५ | १० |

| समांतर आरक्षण | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण | १* | ० | ० | ० | १* | ० | ० | २* | २ | ६ |
| महिला आरक्षण ३०% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | २ |
| माजी सैनिक १५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| पदवीधर/ पदविकाधारकअंशकालीन १०% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| प्रकल्पग्रस्त ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| खेळाडू ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भूकंपग्रस्त २% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| **एकूण** | **१** | **०** | **०** | **०** | **१** | **०** | **०** | **३** | **५** | **१०** |

* ४ अनुशेषातील पदे व १ पद OL (One Leg Affected) प्रवर्गाकरीता राखीव.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | वरिष्ठ लिपिक (भांडार) (गट क)<br>Senior Clerk (Stores)<br>रु.५२००-२०२०० ग्रेड पे-२४०० | २ | २ | विज्ञान शाखेत उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (HSC Science) परीक्षा उत्तीर्ण. | --- |

| **एकूण रिक्त पदसंख्या** | **अजा** | **अज** | **विजा (अ)** | **भज (ब)** | **भज (क)** | **भज (ड)** | **विमाप्र** | **इमाव** | **खुला** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| विहित सामाजिक आरक्षण | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | २ |

| **समांतर आरक्षण** | **अजा** | **अज** | **विजा (अ)** | **भज (ब)** | **भज (क)** | **भज (ड)** | **विमाप्र** | **इमाव** | **खुला** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण | १* | ० | ० | ० | ० | ० | ० | १* | ० | २ |
| महिला आरक्षण ३०% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| माजी सैनिक १५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| पदवीधर/ पदविकाधारकअंशकालीन १०% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| प्रकल्पग्रस्त ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| खेळाडू ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भूकंपग्रस्त २% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| **एकूण** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **१** | **०** | **२** |
| * २ अनुशेषातील पदे | | | | | | | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | कनिष्ठ प्रयोगशाळा सहायक (गट क) Junior Laboratory Assistant रु.५२००-२०२०० ग्रेड पे-२००० | ७ | ७ | विज्ञान विषयासह माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्र (SSC with Science) उत्तीर्ण. | --- |

| **एकूण रिक्त पदसंख्या** | **अजा** | **अज** | **विजा (अ)** | **भज (ब)** | **भज (क)** | **भज (ड)** | **विमाप्र** | **इमाव** | **खुला** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| विहित सामाजिक आरक्षण | ० | ० | १ | ० | ० | ० | १ | २ | ३ | ७ |

| **समांतर आरक्षण** | **अजा** | **अज** | **विजा (अ)** | **भज (ब)** | **भज (क)** | **भज (ड)** | **विमाप्र** | **इमाव** | **खुला** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण | ० | ० | १* | ० | ० | ० | १ | १* | १ | ४ |
| महिला आरक्षण ३०% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | २ |
| माजी सैनिक १५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| पदवीधर/ पदविकाधारकअंशकालीन १०% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| प्रकल्पग्रस्त ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| खेळाडू ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भूकंपग्रस्त २% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| **एकूण** | **०** | **०** | **१** | **०** | **०** | **०** | **१** | **२** | **३** | **७** |

*२ अनुशेषातील पदे

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६ | लिपिक टंकलेखक (गट क)<br>Clerk Typist<br>रु.५२००-२०२०० ग्रेड पे-१९०० | १२ | १२ | सांविधिक विद्यापिठाची कोणत्याही शाखेतील पदवी किंवा शासनाने त्याच्याशी समतुल्य म्हणून घोषित केलेली अन्य कोणतीही अर्हता. शासकीय वाणिज्य मंडळाची इंग्रजी ४० श.प्र.मि. टंकलेखन किंवा मराठी ३० श.प्र.मि.टंकलेखन परीक्षा उत्तीर्ण. | --- |

| एकूण रिक्त पदसंख्या | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| विहित सामाजिक आरक्षण | १ | १ | १ | ० | १ | ० | १ | १ | ६ | १२ |

| समांतर आरक्षण | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण | १ | १* | १ | ० | १ | ० | १ | १* | २ | ८ |
| महिला आरक्षण ३०% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | २ |
| माजी सैनिक १५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| पदवीधर/ पदविकाधारकअंशकालीन १०% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| प्रकल्पग्रस्त ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| खेळाडू ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भूकंपग्रस्त २% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| **एकूण** | **१** | **१** | **१** | **०** | **१** | **०** | **१** | **१** | **६** | **१२** |
| * २ अनुशेषातील पदे व १ पद OL (One Leg Affected) प्रवर्गाकरीता राखीव. | | | | | | | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७ | दूरध्वनीचालक (गट-क)<br>Telephone Opretor<br>रु.५२००-२०२०० ग्रेड पे-१९०० | १ | १ | माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्र (SSC) उत्तीर्ण. दूरध्वनीचालक प्रशिक्षणाचे मान्यताप्राप्त शासकीय संस्थेचे प्रमाणपत्र. मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेमध्ये प्रभुत्व. | --- |

| समांतर आरक्षण | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १* | ० | १ |
| * १ अनुशेषातील पद | | | | | | | | | | |

सदर संवर्गात एकच पद रिक्त असल्याने समांतर आरक्षणाच्या परिगणनेनुसार पद उपलब्ध होत नाही.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८ | वाहनचालक (गट-क)<br>Driver<br>रु.५२००-२०२०० ग्रेड पे-१९०० | ३ | ३ | माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण आणि मोटार वाहन अधिनियम १९८८ (१९८८ चा ५९) मधील तरतूदीनुसार सक्षम अनुज्ञप्ती प्राधिकारी यांनी दिलेला हलके मोटार कार किंवा मध्यम प्रवासी वाहन किंवा जड प्रवासी वाहन चालविण्याचा परवाना धारण आवश्यक. | शासकीय, निमशासकीय किंवा खाजगी संस्थेमध्ये हलके मोटार कार किंवा मध्यम प्रवासी वाहन किंवा जड प्रवासी वाहन चालविण्याचा तीन वर्षाहून कमी नाही इतक्या कालावधीचा अनुभव आवश्यक तसेच मोटार वाहन दुरूस्तीचे जुजबी ज्ञान असणे आवश्यक आहे. |

| एकूण रिक्त पदसंख्या | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| विहित सामाजिक आरक्षण | १* | ० | ० | ० | ० | ० | ० | १* | १ | ३ |

| समांतर आरक्षण | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण | १* | ० | ० | ० | ० | ० | ० | १* | १ | ३ |
| महिला आरक्षण ३०% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| माजी सैनिक १५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| पदवीधर/ पदविकाधारकअंशकालीन १०% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| प्रकल्पग्रस्त ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| खेळाडू ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भूकंपग्रस्त २% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| **एकूण** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **१** | **१** | **३** |
| * २ अनुशेषातील पदे | | | | | | | | | | |

* वर विहित केलेल्या कालावधीचा अनुभव धारण करणारे उमेदवार उपलब्ध नसल्यास, निवड समितीच्या शिफारशीनुसार अनुभव कालावधी १ वर्षापर्यंत शिथिल करण्यात येईल.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९ | प्रयोगशाळा परिचर (गट-ड)<br>Laboratory Attendant<br>रु.५२००-२०२०० ग्रेड पे-१९०० | ९ | ९ | माध्यमिक शालांत परीक्षा अनुत्तीर्ण (१० वी नापास) | --- |

| **एकूण रिक्त पदसंख्या** | **अजा** | **अज** | **विजा (अ)** | **भज (ब)** | **भज (क)** | **भज (ड)** | **विमाप्र** | **इमाव** | **खुला** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| विहित सामाजिक आरक्षण | १* | १ | १* | ० | ० | ० | ० | १ | ५ | ९ |

| **समांतर आरक्षण** | **अजा** | **अज** | **विजा (अ)** | **भज (ब)** | **भज (क)** | **भज (ड)** | **विमाप्र** | **इमाव** | **खुला** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण | १* | १ | १* | ० | ० | ० | ० | १ | २ | ६ |
| महिला आरक्षण ३०% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | २ |
| माजी सैनिक १५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| पदवीधर/ पदविकाधारकअंशकालीन १०% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| प्रकल्पग्रस्त ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| खेळाडू ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भूकंपग्रस्त २% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| **एकूण** | **१** | **१** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **१** | **५** | **९** |

* २ अनुशेषातील पदे व १ पद OL (One Leg Affected) प्रवर्गाकरीता राखीव.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १० | चपराशी (गट-ड)<br>Peon<br>रु.४४४०-७४४० ग्रेड पे-१३०० | ३ | ३ | माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण. | --- |

| एकूण रिक्त पदसंख्या | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| विहित सामाजिक आरक्षण | ० | १* | १* | ० | ० | ० | ० | ० | १ | ३ |

| समांतर आरक्षण | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण | ० | १* | १* | ० | ० | ० | ० | ० | १ | ३ |
| महिला आरक्षण ३०% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| माजी सैनिक १५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| पदवीधर/ पदविकाधारकअंशकालीन १०% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| प्रकल्पग्रस्त ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| खेळाडू ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भूकंपग्रस्त २% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| **एकूण** | **०** | **१** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **१** | **३** |
| * २ अनुशेषातील पदे | | | | | | | | | | |

**टिप :- वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.**

गृह विभाग, शासन निर्णय क्र.एचडीओ-२०११/प्र.क्र.४/आस्था-१, दि.९.३.२०११, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र.न्यायाप्र-२०११/प्र.क्र.३५/अ.क.२, दि.३.७.२०१३ व समक्रमांक दि.१.९.२०१५ तसेच गृह विभाग, शासन निर्णय क्र.एफएसएल-०४१७/प्र.क्र.११९/पोल-४, दि.७.९.२०१७ अन्वये अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्काचे संरक्षण) अधिनियम, १९९५ नुसार संचालनालयाच्या आस्थापनेवरील पदे नि:समर्थ असलेल्या व्यक्तींसाठी सुनिश्चित करण्यात आलेली आहेत.

**३. परीक्षा शुल्क :-**

**अनु.क्र.१ ते १०** वरील प्रत्येक पदांकरीता अमागास प्रर्वगातील उमेदवार : रुपये ५००/-

मागासवर्गीय उमेदवार : रुपये २५०/-

**माजी सैनिकांना परिक्षा शुल्क निरंक राहील.**

विजा-अ, भज-ब, भज-क, भज-ड, विमाप्र व इमाव प्रवर्गातील उन्नत व प्रगत गटात (क्रिमीलेअर) मध्ये मोडणा-या म्हणजेच ज्यांचे वार्षिक उत्पन्न रू.६.०० लाखापेक्षा अधिक आहे अशा उमेदवारांनी त्यांना आरक्षणाचा व वयोमर्यादेचा फायदा देय नसल्याने त्यांनी अमागास उमेदवारांप्रमाणे आवश्यक संपूर्ण परिक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे व त्यांना खुला गटातील समजण्यात येईल. तसेच ते वयोमर्यादेतील सवलतीसह कोणत्याही सवलतीस पात्र समजले जाणार नाहीत.

४. <u>वयोमर्यादा</u> :-

४.१. जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या पदांसाठी अर्ज सादर करणा-या उमेदवाराचे वय दि.२४.०३.२०१८ रोजी गणले जाईल.

**खुला प्रवर्गातील उमेदवाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे.**

४.२. मागासवर्गीयांसाठी कमाल वयोमर्यादा ५ वर्षे (४३ वर्षापर्यंत) शिथिलक्षम राहील.

४.३. शासकीय कर्मचा-यांना कमाल वयोमर्यादेची अट नाही.

४.४. सशस्त्र दलात किमान ६ महिने सेवा केलेल्या माजी सैनिकांमधील, त्यांनी सशस्त्र दलात केलेला अखंड सेवाकाल अधिक ३ वर्षे एवढा काल त्यांच्या विहीत दिनांकाच्या वयातून वगळून त्या दिनांकास येणारे त्यांचे वय विचारात घेतले जाईल. शासन शुध्दीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक मासैक-१०१०/प्र.क्र.२७९/१०/१६-अ, दिनांक २०.८.२०१० नुसार माजी सैनिकांसाठी शासन सेवेतील वर्ग-३ व वर्ग-४ मधील पदांसाठी नेमणूकीकरीता कमाल वयोमर्यादा ४५ वर्षेपर्यंत राहील. बडतर्फीने, गैरवर्तणूक किंवा अकार्यक्षमता या कारणांसाठी अथवा सैनिकी सेवेसाठी शारीरिक क्षमता नसल्याने किंवा आजारपणामुळेसेवा संपुष्टात आलेले माजी सैनिक/आणीबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिकारी वयोमर्यादेच्या सवलतीसाठी पात्र ठरणार नाहीत. तसेच विकलांग माजी सैनिकांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे राहील.

४.५. नि:समर्थ असलेल्या व्यक्तींच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे राहील.

४.६. स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य, १९९१ जनगणना कर्मचारी व १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी यांना कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहील. या घटकातील मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहील.

४.७. पदवीधर/पदविकाधारक अंशकालिन उमेदवारांच्या बाबतीत त्यांनी सुशिक्षित बेरोजगार अर्थसहाय्य योजनेंतर्गत कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये ३ वर्षापर्यत दरमहा मानधनावर काम केलेले असले पाहिजे. तसेच सदरच्या अनुभवाची नोंद रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये केलेली असली पाहिजे. निवड झालेल्या अंशकालीन कर्मचा-यांनी त्यांच्या अनुभवाची सेवायोजन कार्यालयाकडील प्रमाणपत्र उमेदवारास नियुक्तीच्या वेळी सादर करावी लागतील. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.अंक-१००९/प्र.क्र.२००/२००९/१६-अ, दि.२७.१०.२००९ नुसार अंशकालीन कर्मचा-यास कमाल वयोमर्यादा ४६ वर्षे इतकी शिथिलक्षम राहील.

४.८. प्रकल्पग्रस्तांच्या बाबतीत महाराष्ट्र शासन निर्णय क्र.प्रकल्प/१००६/मु.स.३९६/प्र.क्र.५६/०६/१६-अ, दि.०३.०२.२००७ नुसार खुल्या व मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा सरसकट ४५ वर्षे राहील.

४.९. नि:समर्थ असलेल्या व्यक्तीने (किमान ४० टक्के) अपंगत्वाबाबतचे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दि.०६.१०.२०१२ रोजीच्या शासनानुसार नवीन संगणकीय प्रणालीव्दारे नवीन नमुन्यातील प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

४.१०. प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त उमेदवारांनी संबंधित जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी दिलेल्या प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्राची मूळ प्रत कागदपत्रे तपासणीवेळी सादर करणे आवश्यक राहील. सक्षम प्राधिका-यांकडून प्रमाणपत्र तपासणीअंती वैधता ग्राहय धरण्यात येईल.

**४.११.** खेळाडूंची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन वयोमर्यादेत ५ वर्षापर्यंत वयाची अट शिथिलक्षम राहील. तथापि, वयोमर्यादेत ५ वर्षासाठी वयाची अट शिथिल करताना कोणत्याही प्रवर्गाच्या उमेदवारांची उच्चतम वयोमर्यादा ४३ वर्षे राहील. खेळाडू प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांची खेळाडूबाबतची प्रमाणपत्रे क्रिडा संचालनालयाकडून प्रमाणित करून घ्यावीत.

**५. <u>शैक्षणिक अर्हता</u> :-**

**अ)** जाहिरातीतील सर्व पदासाठी नमूद केलेली शैक्षणिक अर्हता दि.१२.०४.२०१८ रोजी धारण करणे आवश्यक आहे.

**ब) <u>टंकलेखन अर्हता</u> :-**

मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र किंवा इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र आवश्यक राहील. सदर अर्हता दि.१२.०४.२०१८ रोजी धारण करणे आवश्यक आहे.

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक निवक-१०१०/प्र.क्र.०८/२०१०/१६-अ, दि.६.१०.२०१० अन्वये प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, स्वातंत्र सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य, सन १९९१ चे जनगणना कर्मचारी, १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी व पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन कर्मचारी या सर्व घटकातील उमेदवारांना जर त्यांना लिपिक टंकलेखक पदावर नियुक्ती मिळाली, तर टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी नियुक्तीच्या दिनांकापासून ६ महिने इतक्या कालावधीची मुदत देण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासन, राजपत्र दिनांक ३.९.१९९३ मधील उपपरिच्छेद क्रमांक ३(बी) परंतुकान्वये माजी सैनिक प्रवर्गातून लिपिक टंकलेखक पदावर नियुक्ती मिळाली, तर टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी नियुक्तीच्या दिनांकापासून ११ महिने इतक्या कालावधीची मुदत देण्यात येईल.

**क) <u>संगणक अर्हता</u> :-**

जाहिरातीमधील गट-क पदाकरिता अर्ज करणा-या उमेदवारांची निवड झाल्यास त्यांना महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र. प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.६१/२००१/३९, मंत्रालय, मुंबई दि.१९.३.२००३ नुसार नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत संगणक हाताळणी/वापराबाबतचे खाली नमुद केलेले प्रमाणपत्र प्राप्त करुन सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा त्यांची सेवा कोणतीही पूर्वसुचना न देता समाप्त करण्यात येईल.

**ड) <u>मराठी/ हिंदी भाषा परिक्षा</u> :-**

माध्यमिक शालांत परिक्षेत मराठी/हिंदी विषय घेतले नसल्यास, नियुक्तीनंतर संबंधित नियमानुसार एतदर्थ मंडळाची मराठी / हिंदी भाषा परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

**इ) <u>फक्त वाहन चालक पदाकरिता</u> :-**

मोटार वाहन अधिनियम १९८८ (१९८८ चा ५९) मधील तरतूदीनुसार सक्षम अनुज्ञप्ती प्राधिकारी यांनी दिलेला हलके मोटार कार किंवा मध्यम प्रवासी वाहन किंवा जड प्रवासी वाहन चालविण्याचा दि.१२.०४.२०१८ पूर्वीचा प्राधिकृत परवाना धारण करणे आवश्यक राहील. तसेच वाहन चालविण्याचा स्वच्छ अभिलेख असावा आणि चांगली शारीरिक क्षमता असावी.

**स्वच्छ अभिलेख यामध्ये पुढील बाबीं येतात :-** १) वाहनचालक कोणतीही मादक द्रव्ये किंवा अल्कोहोल सेवन करून वाहन चालविण्याचा किंवा मोटार वाहन अधिनियम, १९८८ (१९८८ चा ५९) मधील कोणत्याही दखल पात्र अपराधासाठी दोषी सिध्द झालेला नसावा. २) वाहनचालकांविरूध्द अपघाताचा गुन्हा दाखल झालेला नसावा.

६. <u>परीक्षेचा अभ्यासक्रम</u> :-

**(अ) गट-क वर्गातील अ.क्र.(१) ते अ.क्र.(४) वरील पदांसाठी (१)** मराठी :- व्याकरण, सोपी वाक्यरचना आणि नेहमीच्या शब्दांचा वापर **(२)** इंग्रजी :- स्पेलिंग, व्याकरण, सोपी वाक्यरचना आणि नेहमीच्या शब्दांचा वापर **(३)** सामान्य ज्ञान :- दैनंदिन घटना,नेहमीचे अनुभव, साहित्य, राजकारण,शास्त्र हे अजमावण्यासाठी प्रश्न सामाजिक औद्योगिक सुधारणा, क्रिडा या क्षेत्रातील महान व्यक्तिंची कार्य सर्वसाधारणपणे भारताच्या विशेष करुन महाराष्ट्राच्या इतिहास व भूगोलाची रुपरेषा यावरील प्रश्न **(४)** बौध्दिक चाचणी विषयक प्रश्न उमेदवार किती जलद व अचूकपणे विचार करु शकतो हे अजमावण्यासाठी प्रश्न विचारण्यात येतील **(५)** विज्ञान शाखेतील रसायनशास्त्र/ भौतिकशास्त्र/संगणक शास्त्र/इलेक्ट्रॉनिक्स/माहिती तंत्रज्ञान/न्यायसहायक विज्ञान तसेच अभियांत्रिकी शाखेतील संगणक शास्त्र/ इलेक्ट्रॉनिक्स/माहिती तंत्रज्ञान आणि Post Graduate Diploma in Digital and Cyber Forensic and Related Law संबंधित पदाकरीता आवश्यक असलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेनुसार प्रश्न विचारण्यात येतील. संबंधित पदाकरीता आवश्यक असलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेनुसार प्रश्नांची रूपरेषा असेल. याप्रमाणे एकूण सदर विषयांकरीता प्रत्येकी ४० गुण ठेवून एकूण २०० गुणांची Computer Based Online परीक्षा घेण्यात येईल. तसेच सर्व पदांची प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी प्रश्न या स्वरुपाची राहील.

**(क) गट-क वर्गातील अ.क्र.(५) ते अ.क्र.(७) वरील पदांसाठी (१)** मराठी :- व्याकरण, सोपी वाक्यरचना आणि नेहमीच्या शब्दांचा वापर **(२)** इंग्रजी :- स्पेलिंग, व्याकरण, सोपी वाक्यरचना आणि नेहमीच्या शब्दांचा वापर **(३)** सामान्य ज्ञान :- दैनंदिन घटना,नेहमीचे अनुभव, साहित्य, राजकारण,शास्त्र हे अजमावण्यासाठी प्रश्न सामाजिक औद्योगिक सुधारणा, क्रिडा या क्षेत्रातील महान व्यक्तिंची कार्य सर्वसाधारणपणे भारताच्या विशेष करुन महाराष्ट्राच्या इतिहास व भूगोलाची रुपरेषा यावरील प्रश्न **(४)** बौध्दिक चाचणी विषयक प्रश्न उमेदवार किती जलद व अचूकपणे विचार करु शकतो हे अजमावण्यासाठी प्रश्न विचारण्यात येतील. याप्रमाणे एकूण सदर विषयांकरीता प्रत्येकी ५० गुण ठेवून एकूण २०० गुणांची Computer Based Online परीक्षा घेण्यात येईल. तसेच सर्व पदांची प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी प्रश्न या स्वरुपाची राहील.

**(ड) गट-क वर्गातील अ.क्र.(८) वरील पदासाठी (१)** मराठी :- व्याकरण, सोपी वाक्यरचना आणि नेहमीच्या शब्दांचा वापर **(२)** सामान्य ज्ञान :- दैनंदिन घटना,नेहमीचे अनुभव, साहित्य, राजकारण,शास्त्र हे अजमावण्यासाठी प्रश्न सामाजिक औद्योगिक सुधारणा, क्रिडा या क्षेत्रातील महान व्यक्तिंची कार्य सर्वसाधारणपणे भारताच्या विशेष करुन महाराष्ट्राच्या इतिहास व भूगोलाची रुपरेषा यावरील प्रश्न **(३)** वाहतूक नियम विषयक प्रश्न विचारण्यात येतील. याप्रमाणे एकूण सदर विषयांकरीता प्रत्येकी २० गुण ठेवून एकूण ६० गुणांची Computer Based Online परीक्षा घेण्यात येईल. तसेच सर्व पदांची प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी प्रश्न या स्वरुपाची राहील.

**(इ) गट-ड वर्गातील पदांसाठी :- अ.क्र.(९) व अ.क्र.(१०) वरील पदाकरीता** विहित करण्यात आलेल्या शैक्षणिक अर्हतेच्या स्तरावरील एकूण १०० गुणांची परीक्षा घेण्यात येईल. त्यामध्ये **(१)** मराठी व **(२)** सामान्य ज्ञान या विषयांकरीता प्रत्येकी ५० गुण ठेवून एकूण १०० गुणांची Computer Based Online परीक्षा घेण्यात येईल. सदर परीक्षेसाठी वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी स्वरूपाचे प्रश्न असतील.

७. **परीक्षेचे स्वरुप** :-

| अ. क्र. | संवर्ग | परीक्षेसाठी गुण | | |
|---|---|---|---|---|
| | | लेखी परीक्षा | व्यावसायिक चाचणी | एकूण गुण |
| १ | वैज्ञानिक सहायक | २०० | - | २०० |
| २ | वैज्ञानिक सहायक (संगणक गुन्हे, ध्वनी व ध्वनीफीत विश्लेषण) | २०० | - | २०० |
| ३ | वरिष्ठ प्रयोगशाळा सहायक * | २०० | - | २०० |
| ४ | वरिष्ठ लिपिक (भांडार) * | २०० | - | २०० |
| ५ | कनिष्ठ प्रयोगशाळा सहायक | २०० | - | २०० |
| ६ | लिपिक टंकलेखक | २०० | - | २०० |
| ७ | दूरध्वनीचालक | २०० | - | २०० |
| ८ | वाहनचालक | ६० | ४० | १०० |
| ९ | प्रयोगशाळा परिचर | १०० | - | १०० |
| १० | चपराशी | १०० | - | १०० |

* वरिष्ठ प्रयोगशाळा सहायक/ वरिष्ठ लिपिक (भांडार), गट-क या पदांसाठी एकच Computer Based Online परीक्षा घेण्यात येणार असल्याने उमेदवारांना सदर दोन्ही पदांसाठी आवेदन अर्ज सादर करता येतील. त्यानुसार ज्या पदासाठी आवेदन अर्ज सादर केलेला आहे त्याच पदाच्या निवडीसाठी संबंधित उमेदवाराचा विचार करण्यात येईल. परंतु, प्रत्येक पदासाठी वेगवेगळे परीक्षा शुल्क भरणे आवश्यक राहील.

८. **आरक्षणासंबंधी अटीं/ नियम** :-

**८.१.** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्ती जाती, भटक्या जमाती, विशेष मागासवर्ग व इतर मागासवर्ग यासाठी आरक्षण अधिनियम, २००१ (सन २००४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र. ०८) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक २९.०१.२००४ पासून अंमलात आणला आहे. उपरोक्त अधिनियमानुसार आरक्षणासंबंधीच्या तरतूदीं लागू होतील.

**८.२.** वरील अधिनियमानुसार फक्त अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती यांना सोडून उर्वरित मागासवर्गातील सर्व जाती प्रवर्गातील म्हणजे वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र., इतर मागासवर्ग यांना उन्नत / प्रगत गटाचे (क्रिमिलेअर) तत्व लागू केले आहे. त्या प्रवर्गातील उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सन २०१६-१७ व सन २०१७-१८ या वित्तीय वर्षाचे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र धारण केले असले पाहिजे.

**८.३.**मागास प्रवर्गातील उमेदवारांनी जातीच्या दाखल्याबरोबरच जात पडताळणी समितीने वैध ठरविलेले जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. शासन निर्णय क्र. बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दि.१२.१२.२०११ नुसार जात वैधता प्रमाणपत्र मिळणेकरिता संबंधित जात वैधता समितीस आवश्यक ते दस्तऐवज सादर केल्याची पोचपावती सादर केल्यानंतरच **तात्पुरत्या** स्वरुपाची नियुक्ती देण्यात येईल. **जातवैधता प्रमाणपत्र सादर करणे ही सर्वस्वी निवड झालेल्या उमेदवारांची जबाबदारी राहील.**

८.४. अनुसूचित जमाती प्रवर्गाच्या उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच नियुक्ती देण्यात येईल.

८.५. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करताना आवश्यक शैक्षणिक अर्हता व उमेदवारांकरीता लागू असलेली सर्व कागदपत्रे / प्रमाणपत्रे व अर्जात भरलेली माहिती सिध्द करण्याच्या अनुषंगाने आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे / प्रमाणपत्रे जसे उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र, कायमस्वरुपी नि:समर्थ असल्याचे प्रमाणपत्र, प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र, भूकंपग्रस्त प्रमाणपत्र, खेळाडू प्रमाणपत्र, माजी सैनिक कार्यमुक्त प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, पदवी प्रमाणपत्र इत्यादी आवश्यक आहे. जे उमेदवार जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यंत अर्हता धारण करणार नाहीत त्यांचे अर्ज अवैध ठरविण्यात येतील.

९. <u>समांतर आरक्षणासंबंधीत अटीं / नियम</u> :-

९.१. समांतर आरक्षणांतर्गत महिला, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त, खेळाडू, अंशकालीन कर्मचारी यांचेसाठी आरक्षित असलेली पदे त्या त्या प्रवर्गातील भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी आहेत. उर्वरीत पदे त्या त्या प्रवर्गातील समांतर आरक्षणा व्यतिरिक्त आहेत. तसेच समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दि.१३.८.२०१४ आणि तदनंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

९.२. शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग क्र.८२/२००१/मसंआ-२०००/प्र.क्र.४१५/का-२, दि.२५.०५.२००१ मधील तरतुदीनुसार महिलांसाठी ३० टक्के आरक्षण राहील. (महिला आरक्षणांतर्गत महिला उमेदवारांनी अर्ज करतांना उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सन २०१६-१७ व सन २०१७-१८ या वित्तीय वर्षाचे नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र धारण केले असले पाहिजे). (अनुसुचित जाती व जमाती प्रवर्गातील महिला वगळून)

९.३. नि:समर्थ असलेल्या प्रवर्गाकरीता एकूण ३ टक्के आरक्षण राहील. नि:समर्थ असलेल्या प्रवर्गातील उमेदवाराजवळ अपंगत्वाचे प्रमाण ४० टक्क्यापेक्षा कमी अपंगत्व नसल्याचे कार्यालयीन परिपत्रक कार्मिक मंत्रालय, भाषा सरकार नवी दिल्ली क्र. ३६०३५/३/२००४ ईएसटीटी (आरईएस), दि.२९.१२.२००५ प्रमाणे मेडिकल बोर्डाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. अशा पात्र उमेदवारांमधून शासन पत्र क्र.अपंग-२००२/प्र.क्र.३३१/सुधार-३, दि.०७.०६.२००६ अनुसार निवडीस/नियुक्तीस पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. ज्या नि:समर्थ असलेल्या उमेदवारांजवळ नि:समर्थ असल्याचे प्रमाणपत्र उपलब्ध असेल, अशाच नि:समर्थ असलेल्या उमेदवारांनी अपंग आरक्षणांतर्गत अर्ज सादर करावा. फक्त दृष्टीहीन, अल्पदृष्टी, अस्थिव्यंग, सेरेब्रल पाल्सी आणि डिस्लेक्सियाने बाधित व किमान ४०% कायमस्वरूपी विकलांगत्व असलेल्या पात्र उमेदवारांना, ते लिहिण्यासाठी सक्षम नसल्यास, परीक्षा प्रयोजनार्थ गुणवत्तेनुसार लेखनिकाची मदत घेता येईल व अनुग्रह कालावधी अनुज्ञेय राहील. प्रत्यक्ष परीक्षेच्यावेळी उत्तरे लिहिण्यासाठी सक्षम नसलेल्या, पात्र विकलांग उमेदवारांना, लेखनिकाची मदत आणि/अथवा अनुग्रह कालावधीची आवश्यकता असल्यास संबंधित उमेदवाराने ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर केल्याच्या दिनांकापासून सात (७) दिवसांच्या आत आवश्यक प्रमाणपत्र/कागदपत्रांसह विहित नमुन्यामध्ये संचालनालयाच्या अधिपत्याखालील मुंबई, नागपूर, पुणे, औरंगाबाद, नाशिक, अमरावती, कोल्हापूर व नांदेड येथील प्रयोगशाळांच्या प्रमुखांकडे विनंती अर्ज सादर करणे अनिवार्य आहे. ऐनवेळी लेखनिकाची मदत घेता येणार नाही. तसेच लेखनिकाची व्यवस्था स्वत: उमेदवाराने करणे आवश्यक आहे.

९.४. माजी सैनिकांसाठी १५ टक्के आरक्षण राहील. माजी सैनिक असणाऱ्यांनी जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कार्यालय यांच्याकडे नाव नोंदणी केलेली असणे आवश्यक आहे. सदरचे आरक्षण हे केवळ माजी सैनिकांनाच लागू असून त्यांच्या वारसांना या आरक्षणाचा लाभ घेता येणार नाही यांची नोंद घ्यावी. माजी सैनिकांकडे सेवेतून कार्यमुक्त करण्यात आल्याचे कार्यमुक्त प्रमाणपत्र (Discharge Certificate) असणे आवश्यक आहे.

**९.५.** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.न्यायप्र-१००९/प्र.क्र.२०२/०९/१६-अ, दि.२७/१०/२००९ मधील तरतुदीनुसार प्रकल्पग्रस्त व्यक्ती व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींना ५% आरक्षण राहिल.

**९.६.** प्रकल्पग्रस्त म्हणून अर्ज करणाऱ्या उमेदवाराकडे महाराष्ट्र शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.एईएम-१०८०/३५/१६-अ, दि.२१.०१.१९८० नुसार विहित नमुन्यात प्रकल्पग्रस्तांचे प्राधान्यक्रम दाखला असणे आवश्यक राहिल.

**९.७.** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.भूकंप-१००९/प्र.क्र.२०७/२००९/१६-अ, दि.२७.०८.२००९ मधील तरतुदीनुसार भुकंपग्रस्त व्यक्तींसाठी २ टक्के समांतर आरक्षण राहील. शासन निर्णय, वन व महसूल विभाग क्रमांक इक्यूआर-१०९४/प्र.क्र.७६८/भूपूक-१, दि.९.८.१९९५ नुसार संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडून प्रमाणित केलेला भुकंपग्रस्त असल्याचा दाखला / प्रमाणपत्र सादर करणे अत्यावश्यक आहे.

**९.८.** अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंचे आरक्षण शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्र.राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रियुसे-२, दि.०१ जुलै, २०१६ तसेच शासन शुध्दीपत्रक क्र.राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दि.१० ऑक्टोबर, २०१७ आणि शासन शुध्दीपत्रक क्र.राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दि.१५ नोव्हेंबर, २०१७ व शासन निर्णय क्र.राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दि.१६ नोव्हेंबर, २०१७ आणि यासंदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील. सदरचे शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून सदर शासन निर्णयातील तरतूदीं विचारात घेऊनच खेळाडू प्रवर्गातील उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज सादर करावेत.

**१०. ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याची कार्यपध्दती व सूचना :-**

**१०.१** संचालनालयामार्फत घेण्यात येणाऱ्या सदर परिक्षा भरतीसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीनेच स्वीकारण्यात येतील. पात्र उमेदवारला वेब आधारित ऑनलाईन अर्ज www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळाद्वारे सादर करणे आवश्यक आहे. उमेदवाराने सर्व सूचना काळजीपूर्वक वाचून त्यानंतरच अर्ज भरावा.

**१०.२** ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना महापरीक्षा पोर्टल यांच्या www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**१०.३** ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याची सर्वसाधारण प्रक्रिया/टप्पे खालीलप्रमाणे आहे :-

१. उमेदवाराची नोंदणी (Sign Up) करणे.

२. उमेदवाराने माहिती सादर करणे

३. अर्जावरील माहितीचे पुनर्विलोकन

४. ऑनलाईन शुल्क भरणा

५. अर्जाची प्रिंट आऊट

**१०.४** उमेदवाराची नोंदणी (Sign UP) करणे.

**(अ)** उमेदवाराला आपला अर्ज सादर करण्यासाठी www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर Log In करावे लागेल. यासाठी उमेदवाराने आपल्या स्वत:चे Email ID व्दारे संकेतस्थळावर प्रथम आपली नोंदणी करून Sign UP करणे आवश्यक आहे.

**(ब)** महापरीक्षा कडील इतर कोणत्याही परीक्षेसाठी यापूर्वी नोंदणी (Sign UP) केलेल्या उमेदवारांनीही या परीक्षेसाठी पुन्हा नव्याने संकेतस्थळावर नोंदणी करणे आवश्यक आहे.

**(क)** Sign Up व्दारे पोर्टलवर नोंदणी करणेसाठी उमेदवाराकडे नित्य वापरात असेल (Valid) ई-मेल आयडी असणे आवश्यक आहे. तसेच भरती प्रक्रिये दरम्यान पत्रव्यवहार, प्रवेशपत्र आणि इतर माहिती ऑनलाईन देण्यात येणार असल्याकारणामुळे भरती प्रक्रियेच्या संपूर्ण कालावधीमध्ये महा परीक्षा पोर्टलच्या संकेतस्थळावर नोंदणीकृत केलेला ई-मेल आयडी व तसेच अर्जात नमूद भ्रमणध्वनी क्रमांक वैध/कार्यरत राहणे आवश्यक आहे.

**(ड)** उमेदवाराने त्याचे / तिचे खाते सक्रीय करण्यासाठी, त्याच्या /तिच्या इमेल आयडीवर मिळालेल्या सक्रीयतेच्या लिंकवर क्लिक करावे.

**(इ)** उमेदवाराने Sign UP/ Register करणेसाठी संकेतस्थळाच्या मुखपृष्ठावरील आपल्या उजव्या बाजूला असलेल्या सूचना NOTIFICATIONS या विभागातील Recruitment for Forensic Department) या पर्यायावर " 'क्लिक' केल्यांनतर, पोर्टलवरील Recruitment for Forensic Department हे पृष्ठ प्रदर्शित होईल. या पृष्ठावरील " Registration Log-In" या पर्यायावर क्लिक केल्यानंतर Maha Pariksha Registration Portal हे पृष्ठ उघडेल, या पृष्ठावरील Registration या पर्यायावर क्लिक करुन उमेदवाराने आपले User Name , Password , Email ID , ही माहिती भरण्याची प्रक्रिया पूर्ण करावी. यानंतर स्क्रीनवर आपण भरलेली माहिती सेव्ह झाल्याचा Your registration saved व Please check your e -Mail for confirmation असा संदेश प्रदर्शित होईल.

१०.५ उमेदवाराची माहिती सादर करणे.

**(अ)** वरील प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर, उमेदवाराला त्याच्या / तिच्या प्रमाणित (नोंदणी करताना नमूद केलेल्या ) ई-मेल आयडीवर सक्रीयतेची लिंक मिळेल, सदर लिंकवर क्लिक केल्यास Maha Pariksha Registration Portal हे पृष्ठ उघडेल व यावर Your user has been activated असा प्रदर्शित होईल.

**(ब)** या पृष्ठावरील Sign In या पर्यायावर क्लिक करून उमेदवाराने आपला User ID व Password टाकुन Sign In करावे. उमेदवाराने त्याची /तिची लॉगइनची माहिती गोपनीय ठेवावी.एकदा खाते सक्रीय झाले की, उमेदवाराला त्यांच्या नोंदणी पोर्टलचे युजरनेम आणि पासवर्ड वापरून केव्हाही लॉगइन होता येईल.

(क) वरील प्रक्रियेनंतर Declaration पृष्ठ प्रदर्शित होईल. या पृष्ठावरील नमूद अटी / शर्ती वाचून उमेदवाराने त्या मान्य असल्याचे पर्यायावर क्लिक करून उमेदवाराने पोर्टलवर आलेल्या Create Your Profile या पर्यायाव्दारे विचारण्यात येणारी उमेदवाराने आपली प्राथमिक माहिती भरून ती सेव्ह (जतन) करावयाची आहे.

**(ड) छायाचित्र आणि स्वाक्षरी अपलोड करण्यासंबंधी माहिती :-**

वरीलप्रमाणे प्राथमिक माहिती भरून झाल्यानंतर उमेदवाराने स्वत:चे छायाचित्र/फोटो व स्वत:ची स्वाक्षरी स्कॅन करून खालीलप्रमाणे अपलोड करावी.

**(i)** अपलोड करावयाचे छायाचित्र उंची व रुंदी प्रत्येकी २०० pixel असलेले असणे आवश्यक आहे, तसेच छायाचित्राचे आकारमान २० KB ते ५० KB च्या दरम्यान असावे. यापेक्षा जास्त क्षमतेची ईमेज प्रणालीवर स्विकारली जात नाही. छायाचित्र स्कॅन करुन अपलोड करावे.

**(ii)** उमेदवाराने स्कॅन स्वाक्षरी सादर करणेसाठी को-या कागदावर ५ x ४.५ सेमी आकाराचा एक आयत काढा व त्या आयतामध्ये उमेदवाराने स्वत: काळ्या शाईच्या पेनने स्वाक्षरी करून ती प्रतिमा स्कॅन करावी. स्वाक्षरीच्या प्रतिमेची उंची ६० पिक्सल आणि रुंदी १४० पक्सिल असावी आणि प्रतिमेचे आकारमान ३ KB ते ५० KB च्या दरम्यान असावी यापेक्षा जास्त क्षमतेची इमेज प्रणालीवर स्विकारली जात नाही.

**१०.६ परीक्षेसाठी अर्ज सादरीकरण :-** उमेदवाराने आपला अर्ज खालीलप्रमाणे सादर करावयाचा आहे.

**(अ)** वरीलप्रमाणे उमेदवाराने प्रोफाईल मधील पूर्ण माहिती सादर केलेनंतर त्याने स्क्रीन वरील "परीक्षा दाखवा" या पर्यायावर क्लिक केल्यानंतर त्यास चालू परीक्षा/पदाबाबतची यादी याठिकाणी उपलब्ध होईल.

**(ब)** उमेदवाराने परीक्षा यादीतील त्यातील "Forensic Department " हा पर्याय निवड करून त्यास क्लिक केल्यानंतर या जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे भरती करावयाच्या पदासाठी आयोजित करण्यात येत असलेल्या त्यांतर्गत असलेल्या पदांची यादी प्रदर्शित होईल.

**(क)** उमेदवार ज्या पदासाठी अर्ज करण्यास इच्छुक असेल त्या पदाची उमेदवाराने निवड करून अर्ज करावयाचा आहे.

**(ड)** अशाप्रकारे अर्ज करतांना योग्य पदाची निवड करणेसाठी उमेदवारांनी जाहिरातीत तसेच यासंबधीच्या परीक्षा योजना यातील तरतूदींचा काळजीपूर्वक अभ्यास करावा.

**(इ)** उमेदवाराच्या प्रोफाईलच्या आधारे यंत्रणा वैधता तपासेल वापरकर्ता जाहिरातीतील निकष पूर्ण करीत असल्यास वापरकर्त्याला अर्ज सादर करता येईल.

**(ई)** जाहिरातीमध्ये नमूद केलेले निकष वापरकर्ता पूर्ण करीत नसल्यास माहिती संग्रहित होऊ शकत नाही, असा संदेश यंत्रणा प्रदर्शीत करेल. अर्ज यशस्वीरित्या सादर झाल्यानंतर तुमचा अर्ज यशस्वीरित्या जतन झाला असा संदेश यंत्रणा प्रदर्शित करेल.

**१०.७ परीक्षा केंद्राची निवड :-** उमेदवार ऑनलाईन नोंदणी अर्जामध्ये दिल्याप्रमाणे परीक्षा केद्रासाठी प्राधान्यक्रम निवड करणे आवश्यक आहे. यासाठी उमेदवारास तीन प्राधान्य क्रम असतील व त्यात नमूद पर्यायांपैकी उमेदवाराने प्रत्येकी तीन प्राधान्यक्रम निवड करणे आवश्यक आहे. तिन्ही प्राधान्यक्रमांतर्गत प्रत्येकी तीन पर्यायांची निवड करणे , अर्ज पूर्ण करणे साठी आवश्यक आहे. यानंतर उमेदवाराने नोंदणी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी ऑनलाईन शुल्क भरावे.

**१०.८ परीक्षा शुल्क भरणा :-** परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पध्दतींचा अवलंब करावा.

**(अ)** परीक्षा शुल्काचा भरणा हा फक्त Online पध्दतीनेच करावयाचा आहे. यात नमूद केल्याप्रमाणे Online पध्दती व्यतिरिक्त इतर कोणत्याही पध्दतीने भरणा केलेले परीक्षा शुल्क हे विचारात घेतले जाणार नाही.

**(ब)** उमेदवाराने एका पेक्षा अधिक पदांसाठी अर्ज केलेला असल्यास विहित केल्याप्रमाणे प्रत्येक पदासाठी त्याने परीक्षा शुल्क एकाच वेळी भरणा करणे आवश्यक आहे.

**(क)** Online परीक्षा शुल्क भरणा करण्याची पध्दती..

(i) भरणा करण्याकरिता फक्त ऑनलाईन पर्याय उपलब्ध आहेत. त्यासाठी उमेदवार क्रेडिट कार्ड / डेबिट कार्ड / एटीएम पिन / इंटरनेट बँकिंग / वॅलेट / कॅश कार्ड / आयएमपीएस व्दारे शुल्क भरणा करु शकतात.

(ii) उमेदवार आपापल्या सोयीनुसार वरीलपैकी कोणत्याही एका पध्दतीनुसार शुल्क भरणा करु शकतात.

(iii) उमेदवाराला जर वीज पुरवठा किंवा इंटरनेट सेवा खंडित झाल्यामुळे शुल्क भरणा करता आला नाही तर त्याने पुन्हा लॉगइन करुन भरणा प्रक्रिया पूर्ण करावी.

(iv) शुल्क भरणा झाल्यावर उमेदवाराला “भरणा यशस्वी” म्हणून संदेश मिळेल भरणा केलेल्या शुल्काची नोंद / माहिती अर्जामध्ये आपोआप येईल.

(ड) ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर उमेदवाराला त्याच्या प्रोफाईलमध्ये परीक्षा शुल्क भरणा झाला आहे किंवा कसे याची स्थिती (Status) अवगत होईल. त्याची उमेदवाराने अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वीच तपासणी करून खात्री करणे अथवा परीक्षा शुल्काचा भरणा झाल्याबाबत स्थिती उपलब्ध नसल्यास पुन्हा शुल्क भरण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे. विहित दिनांकानंतर या संदर्भातील कोणत्याही प्रकारच्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

**१०.९ नोंदणी व अर्ज भरण्यासाठीचा कालावधी :-**

**पात्र उमेदवारांना www.mahapariksha.gov.in या वेबसाईटव्दारे दि.२४.०३.२०१८ ते दि.१२.०४.२०१८ या कालावधीमध्ये वेब बेस्ड (Web Based) ऑनलाईन अर्ज सादर करणे आवश्यक राहील.**

१०.१० उपरोक्त पदांसाठी घेण्यात येणारी संगणक आधारीत परीक्षा (Computer Based online examination) विविध स्लॉट मध्ये घेण्यात येईल. त्याचा तपशिल उमेदवारांना प्रवेशपत्राबरोबर देण्यात येईल.

१०.११ पात्र उमेदवारांना प्रवेशपत्र, परिक्षा केंद्र व परिक्षेविषयी आवश्यक सूचना ऑनलाईन व एसएमएसव्दारे कळविण्यात येईल व www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावरही उपलब्ध करुन देण्यात येईल. उमेदवारांनी त्यांचे प्रवेशपत्र संकेतस्थळावरुन डाऊनलोड करावीत. संगणकीय परिक्षेनंतर सर्वसाधारण गुणवत्ता यादी www.mahapariksha.gov.in व संचालनालयाच्या dfsl.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. उमेदवारास स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

११. निवडपध्दती :-

**११.१.** जाहिरातीस अनुसरुन पात्र झालेल्या अर्जदारांची संगणक आधारीत परीक्षा (Computer Based online) परिक्षा घेण्यात येईल.

**११.२.** मागासवर्गीय उमेदवारांनी अराखीव पदांसाठीच्या आवश्यक अटीं व शर्तींची पूर्तता (उदा.वयोमर्यादा, परीक्षा शुल्क व अर्हता इ.) केल्यासच अशा उमेदवारांचा अराखीव पदांवर शिफारसीसाठी विचार करण्यात येईल.

**११.३.** उमेदवारांना ऑनलाईन परिक्षेत प्राप्त झालेल्या गुणांनुसार तसेच जाहिरातीमध्ये दर्शविण्यात आलेल्या रिक्त जागांनुसार सामाजिक आणि समांतर आरक्षण विचारात घेऊन निवडसूची यादी तयार करण्यात येईल. सदरची निवडसूची www.mahapariksha.gov.in व **dfsl.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर उमेदवारांच्या माहितीकरीता उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच वरील नमूद सर्व पदांसाठी मुलाखती घेण्यात येणार नाही, याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**११.४.** उमेदवारांकडून मागणी केल्यानंतर सादर केलेल्या अर्जाची सविस्तर छाननी निवडसूची बनविते वेळी केली जाईल. अर्जामध्ये दर्शविलेल्या माहिती पृष्ट्यर्थ योग्य ते दस्तऐवज जमा करणे ही सर्वस्वी उमेदवारांची जबाबदारी राहील, अन्यथा त्यांची निवड रद्द करण्यात येईल.

**११.५.** निवडसूची बनवितांना ज्या उमेदवारांचे एकूण समान गुण असतील अशा उमेदवारांचा गुणवत्तायादीमधील प्राधान्यक्रम सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.प्रानिमं-१२१७/(प्र.क्र.९२/१७)/१३-अ, दि.२.१२.२०१७ मधील तरतूदींनुसार निश्चित करण्यात येईल.

११.६. समांतर आरक्षण हे सामाजिक आरक्षणातंर्गत कप्पीकृत असून ते त्या-त्या सामाजिक आरक्षणाच्या गटातून भरण्यात येते. उपरोक्त समांतर आरक्षणानुसार उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदे त्याच जाती प्रवर्गातील इतर उमेदवारांमधून भरण्यात येतील.

११.७. निवड झालेल्या उमेदवारांनी सिस्टीम जनरेटेड अर्जामध्ये दर्शविलेली त्यांची शैक्षणिक अर्हता, वय, जात, उन्नत-प्रगत गटात मोडत नसणे, प्रकल्पग्रस्त, खेळामधील प्राविण्य, शारिरीक बाधित/व्यंगत्वाचे प्रमाण, माजी सैनिक, भूकंपग्रस्त इत्यादी सिध्द करणे हे सर्वस्वी उमेदवारांची जबाबदारी राहील. यापैकी कोणतीही बाब उमेदवार सिध्द करु न शकल्यास त्याची निवड रद्द करण्यात येईल. तसेच सदर बाबतीत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

११.८. निवडयादीतील शिफारसपात्र उमेदवारांनी मूळ कागदपत्रे सादर करण्याच्या कालावधीमध्ये आवश्यक कागदपत्रे सादर न केल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल.

११.९ बायोमेट्रिक पडताळणीवेळी विसंगती आढळून आल्यास उमेदवारी/निवड रदद केली जाईल.

१२. <u>सर्वसाधारण अर्टी व शर्ती</u> :-

१२.१. उमेदवारास ऑनलाईन पध्दतीने भरलेला आवदेन पत्रातील माहितीच्या आधारे संगणक आधारीत परीक्षेस (Computer Based online examination) बसण्यास तात्पुरती परवानगी देण्यात येईल व निवड झाल्यानंतर प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळेस ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या अर्जातील माहिती अपूर्ण अथवा चुकीची/खोटी आढळून आल्यास उमेदवाराची निवड त्याच टप्प्यावर रद्द करण्यात येईल व त्यांना पुढील सर्व निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येईल.

१२.२. जाहिरातीमध्ये दर्शविण्यात आलेली प्रवर्गनिहाय पदसंख्या कमी, जास्त अथवा रद्द होण्याची शक्यता आहे. आरक्षणात बदल होण्याची शक्यता आहे.

१२.३. जर कोणत्याही उमेदवाराने एकापेक्षा अधिक लॉग इन आयडीसह नोंदणी केली असेल तर उमेदवारांची पहिली यशस्वी नोंदणी फक्त पुढील प्रक्रिया जसे. हॉल तिकीट, परीक्षेतील उपस्थिती, गुणवत्ता यादी आणि अन्य संबंधित प्रक्रियांसाठी विचारात घेण्यात येईल. कोणत्याही डुप्लीकेट नोंदणीस अवैध नोंदणी मानले जाईल आणि कोणत्याही प्रकारचे पैसे परतफेड केले जाणार नाहीत. उमेदवाराद्वारे प्रथम यशस्वी नोंदणीमध्ये काही चुकीची माहिती देण्यात आली असेल तर कृपया या विषयांबद्दलची योग्य प्रक्रिया जाणून घेण्यासाठी enquiry@mahapariksha.gov.in वर लिहा किंवा टोल फ्री नंबर १८०० ३००० ७७६६ वर कॉल करा.

१२.४ जाहिरातीतील नमूद केलेल्या पदांसाठी आवश्यक ती अर्हता धारण करीत असलेल्या पात्र उमेदवारांनीच अर्ज करावा. संबंधित पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांनी ऑनलाईन परिक्षा ही उमेदवारांनी कोणतीही कागदपत्रे व शैक्षणिक अर्हता यांची पूर्वतपासणी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परिक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. उमेदवाराने ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना अर्जात भरलेल्या माहीतीच्या अनुषंगाने कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतर तसेच शैक्षणिक पात्रता पूर्ततेच्या अधीन राहून उमेदवारांची गुणवत्तेच्या आधारे सामाजिक / समांतर आरक्षणनिहाय निवड केली जाईल.

१२.५. महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ अन्वये उमेदवारांनी दिनांक २८.३.२००५ रोजी हयात असलेली व त्यानंतर जन्माला आलेल्या अपत्यांच्या संख्येबाबत विहित केलेले प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील. अर्जदार यांना हयात असलेल्या मुलांची संख्या २ पेक्षा अधिक असेल तर दि.२८ मार्च, २००६ व तदनंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी उमेदवार निवडीस / नियुक्तीस अपात्र ठरविला जाईल.

**१२.६.** शासकिय, निमशासकिय, शासकीय उपक्रम सेवेतील कर्मचाऱ्याने वर नमूद केलेल्या पदांकरिता अर्ज केला असेल, तर सदर कर्मचाऱ्याला सक्षम अधिकाऱ्याने वितरीत केलेले खात्याचे ना हरकत प्रमाणपत्र अंतिम निवडपूर्व कागदपत्रे तपासणीवेळी सादर करणे आवश्यक राहील.

**१२.७.** उमेदवारांना ऑनलाईन परिक्षेसाठी नियोजित स्थळी व वेळी स्व:खर्चाने उपस्थित रहावे लागेल.

**१२.८.** परीक्षेच्या वेळी परीक्षा कक्षामध्ये किंवा परीक्षा केंद्राच्या परिसरात भ्रमणध्वनी अथवा इतर संपर्काची साधने वापरण्यास मनाई आहे.

**१२.९.** उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान पूर्णपणे अवगत असणे आवश्यक आहे याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

**१२.१०.** उमेदवार महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा. तसेच उमेदवाराजवळ महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असल्याबाबतचे स्वत:च्या नावे असलेले अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) जाहिरातीस अनुसरुन अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेले व दिनांक १२.०४.२०१८ रोजी वैध असलेले उपलब्ध असणे आवश्यक आहे. तथापि, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. रिपभ/प्र.क्र.६६/२०११/ई-१०, दि.२७.६.२०११ नुसार ज्या उमेदवारांकडे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) उपलब्ध नसल्यास, त्यांनी त्यांचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याचा जन्मदाखला (Birth Certificate) सादर करणे आवश्यक आहे. अशा प्रकरणात अधिवास प्रमाणपत्राची अट लागू राहणार नाही.

**(अ)** सदर उमेदवाराकडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्मतारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास, त्या उमेदवाराने आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. परंतु सदर शाळा सोडल्याचा दाखल्यामध्ये त्या उमेदवाराचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे. अशा प्रकरणात देखील अधिवास प्रमाणपत्राची अट लागू असणार नाही.

**(ब)** उपरोक्त बाबीं फक्त महाराष्ट्र राज्यात जन्म झालेल्या उमेदवारांसाठी लागू राहतील. इतर उमेदवारांसाठी अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) आवश्यक राहील.

**१२.११.** वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र., इतर मागास प्रवर्ग या मागासप्रवर्गातील उमेदवारांना सामाजिक आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी त्यांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सक्षम प्राधिका-याने दिलेले सन २०१६-१७ व सन २०१७-१८ या वित्तीय वर्षाचे नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र अंतिम निवडपूर्व कागदपत्रे तपासणीवेळी सादर करणे आवश्यक आहे.

**१२.१२.** ऑनलाईन परीक्षेतील गुणानुक्रमे निवडीकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांना मागणी केल्यानुसार कागदपत्रे तपासणीवेळी शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र, गुणपत्रक, अनुभव, समांतर आरक्षणासंबधीची कागदपत्रे, अधिवास (डोमीसाईल), विशेष प्राधान्य गटात मोडत असल्याचे प्रमाणपत्र, शासकीय सेवेतील उमेदवारासाठी नियुक्ती प्राधिका-याचे ना-हरकत प्रमाणपत्र, लहान कुटुंब असल्याचे प्रमाणपत्र तसेच मागासवर्ग जाती प्रमाणपत्र इत्यादी जे-जे उमेदवारास लागू होते त्या दाखल्यांच्या साक्षांकित प्रत व ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करतांना अर्जात भरलेली माहिती सिध्द करण्याच्या अनुषंगाने आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती (Attested copies) या स्व-साक्षांकित करुन अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

**१२.१३.** जाहीरातीमध्ये दिलेली पदांची संख्या बदलण्यासापेक्ष आहे. निवड झालेल्या उमेदवारांना उपलब्ध रिक्त जागा व कामाच्या आवश्यकतेनुसार संचालनालयाच्या अधिपत्याखालील कार्यरत व नव्याने निर्माण होणा-या प्रयोगशाळांमध्ये नेमणूका देण्यात येतील.

१२.१४. सदर पदे ही संचालनालयाच्या अधिपत्याखालील कार्यरत व नव्याने निर्माण होणा-या प्रयोगशाळांमध्ये राज्यस्तरीय बदलीपात्र आहेत.

१२.१५ नियमित नियुक्ती झाल्यानंतर उमेदवारास नवीन परीभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील.

१३. <u>महत्वाच्या सूचना</u> :-

१३.१. या संदर्भातील अधिक माहीती www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

१३.२. उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन (online) पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना शैक्षणिक प्रमाणपत्रे, अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापि, ऑनलाईन अर्जामध्ये संपुर्ण माहिति भरणे आवश्यक आहे व अर्जात भरलेल्या माहितीच्या अनुषंगाने ती सिध्द करण्याकरिता आवश्यक कागदपत्रे ही पडताळणीवेळी सादर करणे ही सर्वस्वी उमेदवारांची जबाबदारी आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना काही त्रुटी राहिल्यास अर्ज संगणकाव्दारे स्विकारला जाणार नाही त्यामुळे उमेदवारांनी अर्ज परिपुर्ण भरण्याची दक्षता घ्यावी. ऑनलाईन अर्ज काळजीपुर्वक भरावा. अचूक अर्ज भरण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

१३.३. उमेदवाराने अर्जात अचूक माहिती भरणे ही त्यांची वैयक्तिक जबाबदारी आहे. एकदा भरलेली माहिती उदा. जात, धर्म, प्रकल्पग्रस्त, खेळाडू, भुकंपग्रस्त, महिला आरक्षण, माजी सैनिक, अपंग इत्यादी बाबतीत भविष्यात कोणताही बदलासंबधित अर्ज स्विकारला जाणार नाही किंवा तसा कोणताही बदल केला जाणार नाही यांची नोंद घ्यावी.

१३.४. उमेदवारांची ऑनलाईन परीक्षा मराठी/इंग्रजी भाषेत घेण्यात येईल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१३.५. ऑनलाईन अर्ज स्विकृत करण्यापूर्वी उमेदवार त्यांनी भरलेल्या माहितीमध्ये बदल करु शकतात. परंतु एकदा अर्ज स्विकृत (Submit) करण्यात आल्यानंतर कोणत्याही प्रकारचा बदल उमेदवारास करता येणार नाही व शेवटी भरलेली माहिती समजण्यात येईल. त्यासाठी अर्ज करतेवेळी उमेदवाराने आवश्यक सर्व तपशील व अर्ज योग्य पध्दतीने भरला आहे याची खात्री करावी. अर्जाची प्रत स्वत:जवळ तयार ठेवावी व अंतिम निवडीपूर्व अर्ज व कागदपत्रे तपासणीसाठी मागिवली जातील त्यावेळी सदर कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील.

१३.६. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर केल्यानंतर त्याची प्रत ही उमेदवारांनी पद भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यत स्वत:जवळ बाळगणे ही सर्वस्वी उमेदवारांची जबाबदारी राहील.

१४. <u>उमेदवारांना इतर महत्वाच्या सूचना</u> :-

१४.१. वरील पदासाठी असणारी किमान शैक्षणिक अर्हता आणि पात्रता धारण करणाऱ्या व ऑनलाईन परिक्षेस पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना या पदांसाठी घेण्यात येणाऱ्या परिक्षेची रुपरेषा, वेळापत्रक, परिक्षा केंद्र, बैठक क्रमांक इत्यादी बाबतची माहिती www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात येईल.

१४.२. उमेदवाराने अर्ज करण्यापूर्वी / भरती प्रकिया शुल्क भरण्यापूर्वी तो संबंधित पदाची अर्हता पूर्ण करतो की नाही याची खात्री करावी. **भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज अपात्र ठरला तर उमेदवाराने भरलेली भरती प्रक्रिया शुल्काची रक्कम परत केली जाणार नाही, तसेच इतर कोणत्याही कारणास्तव भरती प्रक्रिया शुल्क परत केली जाणार नाही.** उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर राजकीय तसेच अन्य कोणत्याही प्रकारे दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमाचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तीची व्यवस्था केल्याचे

आढळल्यास किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती दिल्याचे तसेच प्रमाणपत्रे / कागदपत्रे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची / तिची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

**१४.३** गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीपूर्वी ऑनलाईन आवेदनपत्रात सादर केलेल्या माहितीनुसार मूळ कागदपत्रांची पडताळणी न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयाकडून करुनच नियुक्ती देण्यात येईल. पडताळणीत चूकीचा अपूर्ण अथवा खोटी माहिती आढळून आल्यास त्या टप्प्यावर उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल.

**१४.४.** सदर भरतीप्रकीया पूर्णत: वा अंशत: रद्द करण्याचे अथवा त्यात बदल करण्याचे अधिकार संबंधित शासनमान्य निवडसमिती राखून ठेवत आहे.

**१४.५.** अर्ज सादर करतांना आवश्यक शैक्षणिक अर्हता व उमेदवांराकरिता लागू असलेली सर्व कागदपत्रे/ प्रमाणपत्र व ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करतांना अर्जात भरलेली माहिती सिध्द करण्याच्या अनुषंगाने आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे/प्रमाणपत्रे ही जाहीरातीच्या शेवटच्या दिनांकापुर्वी प्राप्त केलेले व दिनांक १२.०४.२०१८ रोजी वैध असणे आवश्यक आहे.

**१४.६.** उमेदवाराचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना शैक्षणिक कागदपत्र, अन्य प्रमाणपत्र जोडणे आवश्यक नाही. परंतु ऑनलाइन अर्जामध्ये संपूर्ण माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना केलेला जातीचा, महिला, माजी सैनिक, खेळाडू तसेच अपंगत्वाचा दावा इत्यादी बाबींमध्ये तद्नंतर कोणत्याही कारणास्तव बदल करता येणार नाही. त्यामध्ये काही त्रुटी राहिल्यास व अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील. याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही.

**१४.७.** ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याचा अंतिम दि.१२.०४.२०१८ असून त्या दिनांकास रात्री २३.५९ वाजता ऑनलाईन अर्ज स्विकृती बंद होईल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**१४.८.** ऑनलाईन अर्ज भरत असताना काही अडचणी आल्यास त्यासंबंधीची माहिती **ई-मेल:-** enquiry@mahapariksha.gov.in वर आणि टोल फ्री क्रमांक १८००-३०००-७७६६ येथे सोम-शनि वेळ:- सकाळी ०८:०० ते संध्याकाळी ०९:०० या दरम्यान संपर्क साधू शकता.

**१४.९** सदरची जाहिरात राज्य शासनाच्या महापरिक्षा पोर्टलवर www.mahapariksha.gov.in व महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in आणि संचालनालयाच्या dfsl.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**पदभरती प्रक्रियेबाबतचा सर्वसाधारण कार्यक्रम खालीलप्रमाणे राहील.**

| अ.क्र. | कार्यवाहीचा टप्पा | दिनांक व कालावधी |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन अर्ज व शुल्क भरण्याचा कालावधी | दि.२४.०३.२०१८ ते दि.१२.०४.२०१८ |
| २ | प्रवेशपत्र ऑनलाईन प्रिंट काढून घेणे | दि.१९.०४.२०१८ पासून पुढे |
| ३ | Computer Based online परिक्षेचा दिनांक | दि.२७.०४.२०१८ ते दि.३०.०४.२०१८ |

**स्वाक्षरीत/-**

संचालक तथा अध्यक्ष, निवड समिती

न्या.वै.प्र.शाळा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**स्थळ :- मुंबई.**

**दिनांक :- २४.०३.२०१८**